म. ग्र. स. ठाणे
काव्य
४३

श्री

# हिंदुस्थानचा दैदिप्यमान तारा.

## कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.



१८२०

लेखक व प्रकाशक—

रा. रा. **वामन महादेव आठल्ये**,

यांनीं शास्त्रीहॉल, ताडदेव-मुंबई येथें प्रसिद्ध केलें.

मुद्रक—

रा. रा. **गजानन रघुनाथ मुळे**,

पुरंदरे कं. प्रिं. प्रेस, नं. ३ ठाकुरद्वार-मुंबई.

**सन १९२० इसवी.**

सर्व हक्क प्रकाशकानें आपणाकडे ठेविले आहेत.

[illegible] शेंकडा ५० टक्के लोकमान्यांच्या [illegible] दिले जाणार आहेत.

[illegible]त २॥ आणे.

REFBK-0001824
REFBK-0001824

नं.
ता.
ठाणे.



कै. लो. बा. गं. टिळक.

REFBK-0001824
REFBK-0001824

The Bombay Art Printing Works, Fort.




लोकमान्यांचें अखेरचें दर्शन.

B. A. P. Works.

# आर्यांचा विलाप.

१ हरिणीवृत्त.

हरहर असा मोहोरा गेला, जगांतुनि आमुचा ॥
विरह न सहे आम्हां ईशा सुपुत्रचि भूमिचा ॥
कडकडुनियां गर्जन गडाडे ध्वनी बहु भीतिचा ॥
तिलक रविच्या विरहें येतो बहूबहु दुरिंचा ॥ १ ॥

२ पद. चाल–( कसा माझा राजयोगी )

वाग्युद्धीं विजयी झाला, रणीं लढुनी झणीं गेला ॥ धृ० ॥
कसा ईशा तया नेला, तिलक नरकेसरी बाला ॥
सदां दुःखांत वीरानें क्रमुनि तो काल घालविला ॥
कधीं नाहीं सुसौख्याची झुळुक त्या कर्मयोग्याला ॥
परी सेवा स्वदेशाची, कराया धैर्य ये त्याला ॥
असा हा भूपती आमुचा, तुझ्या तो आवडी आला ॥ १ ॥

३. पद. चाल–( हरिची भगिनी ह्मणे )

जरि घेउनियां आमुच्या तिलका वैकुंठाला नेलेंसी ॥
परि ही जनता प्रार्थितसे तुज ऐकुनि घेणें प्रेमेसीं ॥ धृ० ॥
वैकुंठामधिं गडबड आहे मुत्सद्यांची बहु भारी ॥
सल्ला मसलत द्याया कोणी नाहीं ऐसा सुविचारी ॥
गेला घेउनि त्याला जाउनि परि हरकत ही कोण करी ॥
काम जाहल्यावरि त्या भीष्मा पाठविणें बा या नगरीं ॥
पूर्वीच्या सद्गुणांत शतगुण भरुनि तयासि शतायु करी ॥
अयास कांहीं तुलाचि नाहीं तूं भक्तांचा कैवारी ॥
जनता चरणीं प्रार्थुनि वदते ऐकशील तूं खरोखरी ॥

भक्तकाम कल्पद्रुम वदती ऐशी आहे तव थोरी ॥
आजपासुनी जनता राहिल वाट बघित त्या बाळासी ॥
नको अव्हेरूं देवा विनती रक्षण करिं भू-मातेसी ॥ १ ॥
किंवा वाटे मजला बाळा कष्ट फार हे वहु जहाले ॥
दमला थकला बहु फिरफिरुनी ह्मणुनि तयाला तुह्मीं नेलें ॥
असत्य नोहे गोष्ट सत्यही बरीच दिसते या बोलें ॥
खरीच आहे सरी न याला नेलें तुह्मीं प्रेमबलें ॥
कांहीं दिन त्यां ठेउनि ध्यावें द्यावे त्या अमृत पेले ॥
यथेच्छ प्राशन केल्यावरि मग वाटतील कीं श्रम हरले ॥
इतुकें घडल्यावरि मग नाथा क्षण न थांबवी वीरासी ॥
कार्य थोर हें अजुनि राहिलें पाठवाल त्यां साह्यासी ॥ २ ॥

---

## आर्य जननीचा विलाप.

४ पद. चाल–( लक्ष्मी सम चंचल. )

धांव उदधि हो तुफान वेग वायुनी ॥
गिरि-मलया सम लहरी देह फेंकुनी ॥ धा० ॥
क्षण न लावि बा अवधी उदरिं घेउनी ॥
टाकि अतां पूर्ण करी आस मेदिनी ॥
मग काला सौख्य होय हर्ष मानुनी ॥
सहवेना दुःख मला येइ धांवुनी ॥ १ ॥ धां० ॥

५ पद. चाल–( दारिद्र्यें पितया )

विरहानें तिलकाच्या सुचत नच मला ॥ धृ० ॥
दुःख अनिवार फार, उपमे नच कांहीं थार ॥

सोसण्यासि बहु दुस्तर, मार्ग जाहला ॥ १ ॥
कोण शांतवील अतां, आर्य जननि मज वदता ॥
कोण मिळे भू वरता, या महीतला ॥ २ ॥ वि० ॥

६ पद. चाल– ( अभिमान गळोनी गेला. )

बलवंता ये धांवोनी, भेटुं दे तुला कडकडुनी ॥
अनिवार दुःख सोसूनी राहिलास सुख मानोनी ॥ धृ० ॥
चाल–त्या योगें विव्हल मी झालें ॥
करमेना दुःखि निमालें ॥
तुजला मी नच कुरवाळिलें ॥
कधि नाहिं अंकिं खेळविलें ॥
कधि मिष्ट अन्न वाढोनी, भरविलें नाहिं प्रेमानीं ॥ १ ॥
रुसुं नको मजवरी बाळा, मी शिक्षा करितें काळा ॥
भगवाना श्रीगोपाळा, आळवुनी आणितें तुजला ॥
चाल–ऐश्वर्य भूमि रथिं तुजला ॥
बसवीन करिन भूपाला ॥
सिंव्हासन भूतुनि तुजला ॥
भूमोल मणी जडलेला ॥
तें अमोल तुज अर्पोनी होईन साह्य मी जननी ॥ २ ॥
तुज क्षण न विसंबें आतां, वदतसे आर्य भूमाता ॥
काढीन दुष्ट बलवंता, मिठ मोहोऱ्या घेउनि आतां ॥
चाल–देईन रहंवर भूचे ॥
हय अयुधें बहु मोलाचे ॥
निश्चयी यशस्वी साचे ॥
अर्पीन दीन सौख्याचे ॥
हें ऐकुनि घेई ध्यानीं, लाडक्या कुमारा मानीं ॥ ३ ॥

## लोकमान्यांचें शेवटचें दर्शन मुलांनीं घेतल्यावर त्यांच्या मनांत माजलेलें काहूर व त्यांच्यावरील उत्कट प्रेमा.

### ७ पद. चाल–( जानकीनाथ )

तिलक भाग्य रवि अस्ता गेला, सुचत न कांहीं अह्मां मुलांला ॥धृ०॥
सुप्रभात ती पहावयाला, कांहिं न उरली पुढिल पिढीला ॥ १ ॥
रवि अस्तें अंधःकाराला, शक्ति मिळाली धुमाकुळीला ॥ २ ॥
काय धैर्य तें यमधर्माला, राष्ट्रजोत जिवलग कीं नेला ॥ ३ ॥
धीर न त्याला अधिर जहाला, मुलांहुनी हा मूलचि ठरला ॥ ४ ॥
श्रीहरिला जनतें आळविला, बाळतिलक रक्षण करण्याला ॥ ५ ॥
परिदेवा तूं नच रक्षियला, कारण त्याला तुह्मींच झालां ॥ ६ ॥
बालक आह्मीं अन्यायाला, जाणत नाहीं सत् न्यायाला ॥ ७ ॥
न्याय असोवा अन्यायाला, हट्ट पुरविण्या जड न तुह्मांला ॥ ८ ॥
तिलक आमुचा पाठविण्याला, विलंब न करी नमु चरणाला ॥ ९ ॥

### ८ पद. चाल–( शैवालें युक्त )

हे देवा तिलक भेटी क्वचित अह्मां जाहली ॥
विद्वत्ता थोर त्यांची नच आह्मां लाभली ॥
पोटभरी पाहिले ना हुरहुर ही लागली ॥
हत दैवा काय केलें आशा ही भंगिली ॥ १ ॥

### ९ पद. चाल–( पंचतुंड नररुंड मालधर )

पाहियलें तुज लंदनिं जातां, स्यंदनिं बसतां थाटानें ॥
पुष्पाच्छादित रथ विलोकुनी डुलले जन आनंदानें ॥ धृ० ॥
जणुं मोग्या अह्मां भासला, पगडी तांबडी रंगानें ॥

९८२४



तिलकसूर्य अस्तांगत झाल्यानें आर्यमाता
विरहाकुल झाली आहे.

B. A. P. Works.

# हिंदुस्थानचा दैदिप्यमान तारा.



कै० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.

आपल्यावर ओढवलेल्या दुःखदायक संकटानें जिकडेतिकडे हाहाःकार उडून गेला होता. जणूं काय आकाश कडाडून कोसळून जगाची ठिकरी उडावी. समुद्रनारायणानें तुफान होऊन सृष्टी जलमय करून सोडावी. अग्निदेवतेनें आपलें उग्र स्वरूप धारण करून, जगाची खाक करून टाकावी. वायुराजानें आपलें अचाट सामर्थ्य दाखवून जगाला भिंगरीप्रमाणें उडवून द्यावें. सृष्टिदेवतेनें कंपायमान होऊन, सर्व जग आपल्या उदरांत गडप करून टाकावें. तद्वत् हें संकट आपल्यावर ओढवलें आहे.

ह्या देवव्रत महापुरुषाला साष्टांग नमस्कार करून लोकमान्यांचा झालेला व त्यांच्याविषयीं आर्य जननीचा व जनतेचा दुःखविलापी संदेश हा त्यांना पोहोंचो; आणि लोकमान्य त्या दुःखरूपी दुष्ट संदेशाला त्या ठिकाणीं ठेऊन, पुन्हां अवतार घेऊन आपणाला लवकर भेटोत अशी जगदीशचरणीं प्रार्थना करून प्रस्तावना पुरी करतों.

आपला—

**वा. म. आठल्ये.**

१८२५

# विरही प्रस्तावना.

आर्य मित्रांनों, व आर्यभगिनीनों, आपल्या हिंदुस्थानचा अत्यंत दैदीप्यमान तारा, सिंहासनविरहीत राजा लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे तारीख १ ली आगस्ट सन १९२० रोजीं इह लोकींची यात्रा संपवून वैकुंठभुवनांत गेल्यानें, त्यांच्या विरहाचा जबरदस्त धक्का विद्युत् शक्तीप्रमाणें सर्व हिंदुस्थानाला लागून, जिकडे तिकडे हलकल्लोळ उसळून गेला; आणि आपण सर्व जनता त्या दुःखसागरांत बुडून गेलों आहोंत.

आपलीं सर्वांचीं अंतर्यामें त्यांच्या निधन कालापासून त्यांच्या अचाट सामर्थ्याकडे वेधून राहिलीं आहेत. त्यांची अफाट बुद्धिमत्ता, त्यांची विलक्षण धैर्यशक्ति, त्यांचें स्वदेशावरील निःष्कलंक अलोट प्रेम, त्यांचा अवर्णनीय स्वार्थत्याग, निर्लोभी देशसेवेचें चालविलेलें अखंड व्रत, सत्कार्याच्या ठिकाणीं त्यांची अद्भुत चिकाटी, विलक्षण तेज पाडणारी लेखनशैली, जनतेच्या अंतर्यामांत प्रकाश पाडणारें अप्रतिम वक्तृत्व, त्यांचा साधेपणा, त्यांचें अत्यंत पवित्र व शुद्ध आचरण इ. इ. अमोलिक सत्गुण रत्नभांडार बाळगिणारा हा तेजस्वी तारा एकदम अदृश्य झाल्यानें आपल्या देशाची अपरमित हानी झाली आहे. आपणा सर्वांना चैन पडेनाशी झाली आहे. आपण सर्व जन त्यांच्या अखेरच्या दर्शनाकरितां पक्षांप्रमाणें सैरावैरां पळत होतों. सर्व जन, आपले सर्व व्यवहार विसरून त्या महात्म्याच्या दर्शनांत एकतानता करीत होते. आर्यबंधूनां, आर्यभगिनीनां, आर्यकुमारानां व आर्य कुमारीनां हीच सहज समाधी लागली होती.

पेशवाइ अंगरखा आंगीं, देखियलें तुज मौजेनें ॥
बाग चायना मधुनि निघाला, रथ धडकत तो जोमानें ॥
मुंबापुरींतिल जनें तुह्मांवरी, वर्षिलीं पुष्पें प्रेमानें ॥
तैसा दिन अह्मीं नाहीं लक्षिला, काय तुझीं हीं मधु कथनें ॥
वर्णु काय त्या आनंदाला, नेलें तें सुख कालानें ॥ पा० ॥ १ ॥

ह्या ठिकाणीं मुलांचे विचार पूर्ण होऊन आर्यमाता लोकमान्यांचे गुण वर्णीत आहे.

१० पद. चाल—( चंद्रकांत राजाची )

बाळ आमुचा कीर्ति धुरंधर मेरू धैर्याचा ॥
लवाजमा हा तया शोभला स्वयं सैनिकाचा ॥
गंभीर बहु धीर असे परि वीट न कामाचा ॥
गाईसम जन रक्षण करणें कित्ता हा त्याचा ॥
धनसंचय धिःकारुनियां तो सेवक जनतेचा ॥
रथी सारथी तयार राहे जणूं कृष्ण तो पार्थाचा ॥
तिलका धन्य धन्य जन वदती तूंच कृष्ण आमुचा ॥
लक्ष जनांवरी सदां ठेविला जग कल्याणाचा ॥
कमठ पृष्टिसम कठोर मार्गा मृदुतर करण्याचा ॥
राजमार्ग जाणता सूज्ञ तूं अन्य नसे साचा ॥
जान्हवि नीरा समान धीरा ओघ वळविला जनतेचा ॥
चाणाक्ष बहू दीर्घोद्योगी, अभिलाषी तूं सत्याचा ॥ १ ॥ बाळ० ॥

———

## जनतेचे प्रलाप.

११ पद. चाल-( सोडुनि मज राम० )

स्वराज्य सिद्ध हक्क तरुसि वाढवीयलें ॥
निःस्वार्थी निर्लोभी प्रेम मधु जलें ॥ धृ० ॥
लक्ष अमुप राखुनि बहु कष्ट सोशिले ॥
अनुपम हें धैर्य जनस्वार्थि खर्चिलें ॥
धीरोदाधि तूंच योग्य ह्मणुनि साधिलें ॥
धन्य बाळ तिलका तव, तरुसि रक्षिलें ॥ १ ॥ स्व० ॥
तरुसि वाढ बलवत्तर करुनि टाकिली ॥
नव कोमल पल्लव करि जगतिं साउली ॥
कुसुम भार गंध सुटुनि भूमि शोभली ॥
नटवुनियां आर्य भूसी बहुत सुखविलें ॥ २ ॥ स्व० ॥

---

## लोकमान्यांचा संदेश.



REFBK-0001824
REFBK-0001824

१२ पद. चाल-( मित्रा मम जन्म कथा )

तिलक प्रेम पूर्ण असे हिंद भूवरी ॥
विसर कधीं मज न होय सत्य वैखरी ॥ ति० ॥
गेलों जरि चंद्रलोकीं आज येथुनी ॥

सोडुनि प्रिय आर्यांनां दुःख देउनी ॥
आर्य जननि रडविलि मी विरह व्यथेनीं ॥
राष्ट्र हानि विद्वज्जन घेति मानुनी ॥
वैराग्या स्वीकारिती विरस होउनी ॥
परि अधीर दुर्ग भेद झडकरी करी ॥ १ ॥ ति० ॥
आर्यानों मजसाठीं कष्ट सोशिले ॥
दुर्धरशा समयीं मज साह्य दाविलें ॥
मम मुखिचे कुसुमा सम शब्द झेलिले ॥
देवा सम मानुनि मज थोर कल्पिलें ॥
तन मन धन अर्पुनियां मजासिं सुखविलें ॥
विमल चरित केलें तें कथिन श्रीहरी ॥ २ ॥ ति० ॥

१३ पद. चाल- ( हरिची भगिनी ह्मणे )

हरिला कथुनी त्वरितचि येतों, वसुंधरेवरि धैर्यानें ॥
धैर्यगलित नच व्हावें आर्या, कार्या हांका नेटानें ॥ धृ० ॥
निराशवादित्वांत नसे मी, आशावादी राहियलों ॥
अंतकाल हा समीप होता, परि मी नाहीं डगमगलों ॥
एकसारिखा मंत्रचि माझा जरि त्या समयीं गहिंवरलों ॥
परी आत्मविश्वास मंत्र हा, मन्मित्रां कथुनी गेलों ॥
बचाव माझा यांतुनि होइल, बोलियलों स्थिर चित्तानें ॥
महत्कार्य होणार असे तें, सत्य होय प्रभु सत्तेनें ॥ १ ॥
विनती माझी तुह्मांसि आर्यां निराश मेरू फोडाया ॥
तिळसम कण करुनी टाका, धुळीस मिळवा झोडुनियां ॥
राज्यदेवी गजगति वरुनी, किंवा पालखिं बसवुनियां ॥
...वित राहिल आर्यावर्तीं, ऐसें जावें होउनियां ॥

कार्यसिद्धि ही तुमच्या हस्तीं, बहु नेटानें राहुनियां ॥
गेली आहे मनांत उमजा, कथितों जन हृदिं ठसावया ॥
अतां न कवणा सामर्थ्य तुह्मांवीण न दिधलें श्रीहरिनें ॥
असत्य नोहे सत्य कथन हें, निश्चय ठेवा मद्वचनें ॥ २ ॥

माझ्यावर प्रेम करणाऱ्या हिंद्वासीयानों, आपण श्रीकृष्ण भगवंताच्या गीतेवर अढळ विश्वास ठेवा. भगवान गीतेंत असें सांगतात कीं—

१४. पद चाल—( मित्रा मम जन्मकथा )

जीर्ण देह सोडुनि नव देह प्राप्तता ॥
खचित होय आर्यानों कथितसे गिता ॥ धृ० ॥
धूम्र रात्र कृष्णपक्ष दक्षिणायनीं ॥
षण्मासीं देह ठेवि योगि मेदिनीं ॥
चंद्र लोकिं राहुनि मग येइ परतुनी ॥
जन्म घेइ भूतलिं तो भीम बलानीं ॥
कमल नयन वचन असे सत्य मान्यता ॥ जीर्ण० ॥ १ ॥

आर्य बंधूनों, आर्य भगिनीनों, आर्य कुमारानों व आर्य कुमारीनों, मी खात्रीनें लवकर येतों, धैर्य सोडूं नका. कार्य झपाट्यानें चालूं द्या. ह्या जन्मीं कार्याची रूपरेषा २५ व्या वर्षी आंखून स्वदेशकार्याला सुरवात केली होती. आतां येणार तो १२ व्या वर्षापासूनच स्वदेश सेवेचें व्रत आचरणार हें पूर्ण लक्षांत असूं द्या.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४०८

समाप्त.

पुरंदरे कं. प्रि. प्रेस, ठाकुरद्वार—मुंबई.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण,

विनायक महादेव पंडित,

शास्त्री हॉल ताडदेव-मुंबई.